# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४१६/२०२३ दिनांक – ०४/१२/२०२३

## "अल्पवयीन मुलीशी फेसबुकवरुन ओळख करुन जबरी संभोग करणा-या आरोपीस मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून अटक."

फेसबुक अकाउंटद्वारे अल्पवयीन पिडीत मुलीसोबत जुन २०२२ ते दिनांक ०२११.२०२३ रोजी पावेतो आरोपी नामे आदित्य विश्वनाथ भगत याने ओळख करुन मैत्री केली. त्यानंतर तिचे सोबत जबरी संभोग केला. त्यानंतर अल्पवयीन पिडीत ही आरोपीशी संपर्क ठेवत नसल्याने इन्स्ट्राग्रामवर अल्पवयीन पिडीत मुलीचे अश्लील फोटो व्हायरल करुन पिडीतेची बदनामी केली वगैरे मजकुरीचे फिर्यादीवरुन आचोळे पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ५३१/२०२३ भादवि कलम ३७६, ३७६(२) (एन), ५०९,५०६ सह पोक्सो अधिनियम २०१२ चे कलम ४,६,८,१२,१४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६७(ए), ६७(ब) प्रमाणे दिनांक ०३.११.२०२३ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास आचोळे पोलीस स्टेशन हे करीत होते. सदर गुन्हा दाखल झालेपासुन स्थानिक पोलीस त्याचा शोध घेत होते परंतु तो वेळोवेळी आपला ठावठिकाणा बदलुन वावरत होता त्यामुळे गेले ०१ महीन्यापासुन तो मिळुन येत नव्हता.

सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने पोउपनिरी.हितेंद्र विचारे व पथक यांनी आरोपीची तांत्रीक विश्लेषनावरुन माहीती घेतली असता सदर गुन्हयातील आरोपी त्याचे वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदलत होता. केलेल्या तांत्रीक विष्लेषन व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीचे आधारे नमुद आरोपी नामे विश्वनाथ भगत वय २२ वर्षे रा. ए/११२, रुपलक्ष्मी बिल्डींग, क्रास गार्डन जवळ, वेलकनी चर्च जवळ, भाईदर पश्चिम यास दिनांक ०१.१२.२०२३ रोजी उत्तन पोलीस ठाण्याचे हद्दीत वेलकनी चर्च जवळ मिळुन आल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेवुन पुढील कारवाई करणेकामी आचोळे पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सपोउपनिरी. श्रीमंत जेधे, पो.हवा.मनोहर तावरे, पोहवा. सतिष जगताप, पोहवा. काळे यांनी केलेली आहे.

**----0000----**